
फुलशेती

# शेवंती लागवडीतून मिळवा फायदा

**कांचन तायडे**
विषय विशेषज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र,
सेलसुरा, जि. वर्धा
**शंतनु जायले**
सहायक प्राध्यापक,
अनुसयाबाई मेघे कृषी महाविद्यालय,
भूगाव, जि. वर्धा



**जा**गतिक फुलपिकांच्या उलाढालीत गुलाबानंतर शेवंती या पिकाचा क्रमांक लागतो. फुलांचा आकार, आकर्षक रंग आणि उमलण्याची पद्धत या नैसर्गिक देणग्यांमुळे शेवंतीला फुलांची राणी म्हणून ओळखले जाते. चीन हे शेवंतीचे मूळ स्थान असले, तरी शेवंतीचा जगभर प्रसार जपानमधून झाला. चीन, जपान, अमेरिका, युरोप आणि आशियाई देशांत शेवंतीची व्यापारीदृष्ट्या लागवड होते. भारतात महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांत या फुलाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.

**शेवंतीचे महत्त्व :** महाराष्ट्रात सण उत्सवाच्या काळात आणि लग्नसराईत शेवंतीच्या फुलांना प्रचंड मागणी असते. मनाला मोहिनी घालणारा मंद सुगंध या गुणधर्मामुळे शेवंतीची फुले विशेष लोकप्रिय आहेत. त्यामुळे फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर हार, वेण्या, माळा, गुच्छ तयार करण्यासाठी करतात. शिवाय फुलदाणी ठेवण्यासाठीही वापर होतो. शेवंतीच्या मोठ्या आकाराची फुले मोठ्या शहरांतील प्रमुख हॉटेल्समध्ये कट फ्लॉवर्स म्हणून सुद्धा सजावटीसाठी वापरली जातात. या कारणांमुळे शेवंतीचे व्यापारी महत्त्व व खप वाढतच आहे.

**जमीन :** शेवंती पिकासाठी योग्य जमिनीची निवड नेहमीच फायदेशीर ठरते. ज्या जमिनीचा सामू ६.५ ते ७ आहे, अशा जमिनी लागवडीसाठी चांगल्या असतात. मध्यम हलकी, पाण्याचा चांगला निचरा होणारी भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. पावसाळ्यात शेतात जास्त काळ पाणी साठून राहिल्यास उभे पीक नुकसानीत जाते. म्हणजेच पाण्याचा योग्य निचरा न होणारी जमीन या पिकाला मानवत नाही. म्हणून शेवंतीसाठी अत्यंत भारी जमीन निवडू नये.

**हवामान :** शेवंती हे लहान दिवसांचे पीक आहे. म्हणजेच शेवंतीला फुले येण्यासाठी लहान दिवस व कमी तापमानाची आवश्यकता असते. सुरवातीच्या वाढीच्या काळात भरपूर सूर्यप्रकाश व मोठा दिवस असणे आवश्यक आहे. शेवंतीच्या वाढीसाठी २० ते ३० अंश से., तर फुले येण्यासाठी १० ते १७ सें. अंश तापमानाची आवश्यकता असते. शेवंतीची सुरवातीची वाढ जोमदार झाल्यास उत्पादन भरपूर व दर्जेदार मिळते. जास्त आर्द्रता व भरपूर सतत पडणारा पाऊस या पिकाला मानवत नाही. हलका ते मध्यम पडणारा पाऊस शेवंतीसाठी पोषक ठरतो. दीर्घकाळ पडणाऱ्या पावसामुळे शेवंती मूळकुजव्या रोगास बळी पडू शकते.

जमीन : लागवडीसाठी प्रथमतः जमीन उभी-आडवी नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी. जमीन तयार करताना हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीच्या उताराला आडव्या ६० सेंमी अंतरावर सऱ्या सोडून वाफे तयार करावेत. लागवडीसाठी मागील हंगामातील शेवंती पिकाच्या निरोगी काश्या वापराव्यात. लागवड ही सरीच्या दोन्ही बाजूस ३० सेंमी अंतरावर बगलेत करावी. लागवड शक्यतो दुपारची उन्हे कमी झाल्यावर करावी, म्हणजे रोपांची मर कमी होते.

जाती : जगात शेवंतीच्या १५ ते २० हजार जाती असून, भारतात सुमारे ५०० जाती आढळतात. महाराष्ट्रात सोनाली तारा, बग्गी, झिप्री, राजा, पांढरी व पिवळी रेवडी, शरदमाला, बंगळूर, रतलाम चंद्रमा आदी जाती लागवडीखाली आहेत. ■